## शॉर्ट न्यूज

### इको क्लबची स्थापना



■ शिरपूर । प्रतिनिधी

शहरातील आर.सी.पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षण सप्ताह अंतर्गत पर्यावरण पूरक इको क्लबची स्थापना करण्यात आली. या उपक्रमातंर्गत प्रत्येक वर्गातून चार विद्यार्थी निवडण्यात आले. प्राचार्य पी.आर.साळुंखे व पर्यवेक्षक एस.डी. गाडीलोहार यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण १२० विद्यार्थ्यांचा सहभाग इको क्लबमध्ये घेण्यात आला. हे विद्यार्थी इको क्लबच्या माध्यमातून शाळेत तसेच शालेय परिसरात वैयक्तिक स्वच्छता, परिसर स्वच्छता, सार्वजनिक ठिकाण स्वच्छता, वृक्षारोपण महत्व, पर्यावरण संरक्षण अशा विविध विषयावर जनजागृती समाजात निर्माण करतील. या प्रसंगी पर्यवेक्षक एस. डी. गाडीलोहार यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण सुरक्षेचे महत्व समजावून सांगितले. इको क्लबच्या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी इको क्लब विभाग प्रमुख पी.व्ही.गव्हाळे, समन्वयक बी.बी.अग्रवाल, एस.के.पाटील, माता पालक संघ सदस्य उपस्थित होत्या.

### व्यावसायिक शिक्षणावर मार्गदर्शन



■ निजामपूर । वार्ताहर

येथील आदर्श विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शिक्षण साप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात चौथ्या दिवशी यशस्वी उद्योजकाचे मनोगत व्यक्त करण्यासाठी करसल्लागार तुषार खैरनार यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना व्यवसायिक शिक्षण व त्यांच्या संधी याविषयी मार्गदर्शन केले. तसेच उद्योग व्यवसायातील विविध तरतुदी, विविध प्रकारचे हिशोब पुस्तके आणि त्यात हिशोब नोंदवत असताना घ्यावयाची काळजी, यावर मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक बी.आर. गावित, उपप्राचार्य ए.एस.भदाणे तसेच समिती प्रमुख आर.एन.हिरे, वाय.एम.खैरनार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस.जी.मुसळे यांनी केले. आभार एस.एम. मोहने यांनी मानले.

### उदबोधन वर्गाचे आयोजन



■ शिरपूर । प्रतिनिधी

शिरपूर एज्युकेशन सोसायटीच्या आर. सी.पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालयात बी.एड. द्वितीय वर्षातील छात्र अध्यापकांसाठी उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना बी.एड. अभ्यासक्रमाविषयीची संपूर्ण माहिती देण्यात आली. प्राचार्य डॉ.दीपक बाविस्कर यांनी द्वितीय वर्षातील बी.एड. अभ्यासक्रमाची ध्येय व उद्दिष्टे स्पष्ट केली. तसेच ध्येयपूर्तीसाठी महाविद्यालयाचे अकॅडमिक कॅलेंडर कसे असेल आणि आंतरवासिता उपक्रम, अभ्यासक्रमातील संपूर्ण विषय व परीक्षा पद्धती याविषयी माहिती दिली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार बी.एड. अभ्यासक्रमांमध्ये होणाऱ्या बदलांची जाणीव करून दिली. विद्यापीठाच्या प्रात्याक्षिक व परीक्षा पद्धतीतील बदलांबाबत विद्यार्थ्यांना अवगत केले. प्रास्ताविक डॉ. गजानन खेकाडे यांनी केले. तर आभार डॉ. तुषार माळी यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ. पी.एन.कुरकुरे, प्रा. ईश्वर बोरसे, प्रा. जे. वाय.बाविस्कर, ग्रंथपाल डॉ. वाय.पी.धाकड व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. व्ही.एस.पुराणिक व प्रा.जे.एल.चौधरी यांनी प्रयत्न केले.

### चौगाव येथे एकास मारहाण

■ धुळे । प्रतिनिधी

दुचाकीचा कट लागल्याने तालुक्यातील चौगांव चौफुलीवर भटु भुरा पवार (वय ५७ रा.चौगाव) यांना तीन जणांनी लोखंडी पाईपने बेदम मारहाण केली. दि.६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ही घटना घडली. याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल झाला आहे.

# आई-वडील आम्हाला सांभाळतात, असा भाव असावा

## हभप शिवानी गवळी: पिंपळनेर येथे संगीतमय श्री शिवपुराण कथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

■ पिंपळनेर । वार्ताहर

मंदिरात मूर्ती स्वरूपात देवाकडे पाहू नका. देवाशी नाते जोडा तेही भावनिक असावे. संसारातील नाते हे स्वार्थी असते. आई-वडिलांना आम्ही सांभाळतो, त्याऐवजी आई-वडील आम्हाला सांभाळतात, असा भाव जीवनात असावा. मनुष्याने सात्विक आहार घ्यावा, मांसाहार करू नये, असे आवाहन ह.भ.प. शिवानीताई गवळी यांनी केले.

श्री दंमडकेश्वर महादेव मंदिराच्या ३१ व्या वर्धापन दिनानिमित्त ह.भ.प. शिवानीताई गवळी यांचे संगीतमय श्री शिव पुराणकथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला नुकताच प्रारंभ झाला. दि.१२ ऑगष्ट रोजी ह.भ. प. ज्ञानेश्वर महाराज बेलदारवाडी यांचे काल्याचे कीर्तनाने कथेची सांगता होईल.



दररोज सकाळी आठ वाजता सहस्रविष्णूनाम, ८.३०.त ११ पर्यंत ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी २.३० ते ५ ज्ञानेश्वरी पारायण, सायंकाळी ५ ते ७ हरिपाठ व रात्री ८.३० ते ११.३० पर्यंत हभप शिवानी गवळी यांचे संगीतमय शिवपुराण कथा होत आहे. पहिल्या दिवशी सजवलेल्या रथावरून ज्ञानेश्वरी व शिवानीताईंची मिरवणूक काढण्यात आली.

### सजीव देखाव्यातून कथेचे सादरीकरण

सजीव देखाव्यातून शिव महापुराणाची महिमा सादर केली जात आहे. यात ब्रह्मा, विष्णू, महेश, उत्पत्ती तसेच शंकर-पार्वती विवाह, दक्ष राजाचा होम, कालभैरव, महादेवाचे तांडव नृत्य, असे विविध देखाव्यातून संगीतमय शिवपुराण कथा हभप शिवानी तहाराबादकर या सादर करीत आहेत.

यावेळी हभप यशोदा जायखेडकर, हभप शांतीसागर जयराम बाबा गोंडेगावकर, हभप ज्ञानेश्वर महाराज बेलदारवाडी, हभप आनंद जीवन स्वामी धुळे, हभप मेघश्याम महाराज शिंदखेडा, भागवताचार्य महंत पंडित गुरुजी नासिक, प्रमोद महाराज भोंगे शिरपुर, महंत सतीश महाराज भोंगे शिरपूर, महंत प्रणव गिरी महाराज नागाई, हभप सुदर्शन महाराज गोंदूर धुळे, हभप योगी दिनानाथ महाराज कळंभीर, हभप संतोष महाराज शिरपुर, ज्ञानेश्वरी व्यासपीठ देविदास महाराज धुळे, हभप बाबा महाराज आक्राळे, राजेंद्र जोशी महाराज, प्रमोद महाराज जोशी व खानदेश वारकरी मंडळ उपस्थित होते. चार दिवसापासून दंमडकेश्वर लॉन्सवर कार्यक्रम सुरू असून त्यास हजारो महिला व पुरुषा भाविकानी हजेरी दिली.

कार्यक्रमाचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक हभप भालचंद्र दुसाने व रवींद्र दुसाने, पिंपळनेर यांनी केले आहे.

## महानोकरी मेळाव्यातून देणार ५ हजार तरुणांना नोकरी -हिलाल माळी

■ धुळे । प्रतिनिधी

धुळे ग्रामीणसह जिल्ह्यातील सुशिक्षित तरुणांना रोजगार मिळवून देण्यासह जिल्ह्यातील बेरोजगारी कमी करण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे दि.११ ऑगस्ट रोजी देवपूरातील महाजन हायस्कूलमध्ये महानोकरी मेळाव्याचे आयोजन केले आहे. त्यात ५० हून अधिक नामांकित कंपन्या सहभागी होणार असून त्यात जागेवरच ५ हजार तरूणांना नोकरी देण्यात येईल. अशी माहिती आयोजक, सहसंपर्कप्रमुख हिलाल माळी यांनी पत्रपरिषदेत दिली.

शहरातील फुलवाला चौकातील हिलाल माळी यांच्या संपर्क कार्यालयात आयोजित पत्रपरिषदेला सहसंपर्क प्रमुख अतूल सोनवणे, निलेश शेलार आदी उपस्थित होते. हिलाल माळी यांनी सांगितले की, शिवसेना पक्ष प्रमुख तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसाचे औचित साधुन धुळे ग्रामीण मतदार संघात २० ऑगष्टपर्यंत महिनाभर सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. त्याअंतर्गत दि. ११ रोजी महाजन हायस्कुलमध्ये या महानोकरी मेळाव्याचे आयोजन केले आहे. सकाळी ९ वाजता मेळाव्याला सुरूवात होईल. या मेळाव्यात पाच हजार सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगार देण्याचा संकल्प केला असून या मेळाव्यात नाशिक, संभाजी नगर, पुणे, जळगाव येथून ४० ते ५० नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. मेळाव्यात मुलाखतीनंतर जागेवर नोकरीची ऑर्डर मिळणार आहे. आतापर्यंत ३ हजार तरुणांनी ऑनलाईन पध्दीने आपली नावे नोंदवून सहभाग घेतला आहे. दरवर्षी अशा प्रकारे महानोकरी मेळाव्यातून हजारो तरुणांना रोजगार देण्याचा शिवसेनेचा निर्धार आहे.

मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी जिल्हा संपर्क प्रमुख अशोक धात्रक हे असतील. तर उद्घाटन माजी खा. उन्मेश पाटील व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते होईल. प्रमुख अतिथी म्हणून शिवसेना उपनेत्या शुभांगी पाटील, माजी आ.शरद पाटील, शिवसेना सहसंपर्क प्रमुख अतुल सोनवणे, हेमंत साळुंके, जिल्हा संघटक भगवान करनकाळ, विधान सभा संपर्क प्रमुख विजय सुळे, सुनिल पाटील, रविंद्र धनावटे, राजु पवार, उपजिल्हा प्रमुख कैलास पाटील, किरण जोंधळे, नानाभाऊ सोनवणे, भरत राजपूत, जिल्हा समन्वयक भरत म्हस्के, भरत राजपूत, महानगर प्रमुख धिरज पाटील, सुशील महाजन आदी उपस्थित राहणार आहेत. मेळाव्यासाठी तरुणांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असेही आवाहन हिलाल माळी यांनी केले आहे.



## दोंडाईचातील पाणीपुरवठा वारंवार विस्कळीत

■ दोंडाईचा । श.प्र

शहरात गेल्या दोन वर्षभरापासून प्रशासनाच्या चुकीच्या नियोजनामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. राखीव मोटार व स्टार्टर आदी यांत्रिक उपकरणांची उपलब्धता नसल्यामुळे कार्यरत मोटार किंवा इतर मशिनरी खराब झाल्यास ते दुरुस्त होईपावेतो वारंवार पाणीपुरवठा वारंवार विस्कळीत होत आहे. त्यामुळे संबंधित ठिकाणी पर्यायी व्यवस्था निर्माण करीत शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करावा. अन्यथा नागरिकांसह नगरपलिकेवर हंडा मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा शहराध्यक्ष प्रविण महाजन यांनी दिला आहे. याबाबत मुख्याधिकारी देवेंद्र परदेशी यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष विजय मराठे, माजी बांधकाम सभापती निखिल जाधव, जितेंद्र गिरासे, माजी आरोग्य सभापती कृष्णा नगराळे, नरेंद्र गिरासे, भरती ठाकुर, चिरंजीव चौधरी, ईश्वर धनगर, महेंद्र कोळी आदी उपस्थित होते.

## नेर येथे पशुवैद्यकीय दवाखान्याचे भूमिपूजन; जि.प.शाळा इमारतीचेही लोकार्पण

■ धुळे । प्रतिनिधी

तालुक्यातील नेर गावात धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून आतापर्यंत विविध विकास कामांसाठी तब्बल १२ कोटी ९६ लक्ष रुपयांचा निधी मंजुर करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने सुमारे ५५ लक्ष रुपये खर्चातून नवीन पशुवैद्यकीय दवाखाना उभारण्यात येणार असून या इमारतीचे भूमीपुजन आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान महादेव वस्ती नेर येथे नवीन जि.प.मराठी शाळेची इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून या इमारतीचेही लोकार्पण आ.पाटील यांच्या हस्ते झाले.

नेर येथील महादेव वस्तीतील विद्यार्थ्यांचा शिक्षणाची सोय व्हावी म्हणून नव्याने जि.प.शाळेची इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे. एकूण ३६ लक्ष रुपये खर्चातून चार वर्ग खोल्या असलेली जि.प.शाळेचे बांधकाम झाले आहे.



### आ.कुणाल पाटलांमुळे विकासाला चालना

आ.कुणाल पाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि त्यांच्या पाठपुराव्यामुळे नेर गावात आतापर्यंत सुमारे १२ कोटी ९६ लक्ष रुपयांचा विकास निधी मंजुर करता आला. त्यामुळे गावातील विकासाला चालना देत गाव विकासाच्या दिशेने घेवून जाण्यास मदत झाली असल्याचे जि.प.सदस्य आनंद पाटील आणि सरपंच गायत्री देवी जयस्वाल यांनी यावेळी मनोगत व्यक्त करतांना सांगितले.

तर आ.कुणाल पाटील यांच्या स्थानिक विकास निधीतून एकूण २५ लक्ष ९९ हजार रुपये खर्चातून सार्वजनिक वाचनालयाचे बांधकाम करण्यात आले आहे. तसेच आ.कुणाल पाटील यांच्या विशेष प्रयत्नाने पांझरा नदीवर मोठ्या पुलासाठी एकूण १० कोटी रुपयांचा निधी मंजुर करण्यात आला होता. नेर आणि परिसरातील शेतकऱ्यांच्या पशुधनावर वैद्यकीय उपचार करण्यासाठी नेर येथे असलेल्या पशुवैद्यकीय दवाखान्याची इमारत जीर्ण झाली होती. या इमारतीचे नव्याने बांधकाम करण्यात यावे म्हणून एकूण ५५ लक्ष रुपयांचा निधी मंजुर करण्यात आला आहे. या नवीन इमारत बांधकामाचे आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते भूमीपुजन करण्यात आले. तसेच गावांतर्गत रस्ता कॉक्रीटीकरण करणे, पेव्हर ब्लॉक बसविणे, सामाजिक सभागृहाचे बांधकाम करणे, अमरधाममध्ये कॉंक्रीटीकरण करणे, अशा विविध विकास कामांचे भूमीपूजन व उद्घाटन आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाला आ.कुणाल पाटील यांच्यासोबत जि.प.सदस्य आनंद पाटील, सरपंच गायत्री जयस्वाल, पं.स.सदस्य अंजनाबाई मोरे, केंद्र प्रमुख विठ्ठल घुगे, रायबा कुणाल पाटील, उपसरपंच दयाराम चव्हाण, बाजार समितीचे संचालक रावसाहेब पाटील, ऋषीकेश ठाकरे, ज्येष्ठ नेते प्रकाश देशमुख, बाळू आनंदा पाटील, गणेश जयस्वाल, योगेश गवळे, माजी सभापती दिनेश पाटील, मुकूंद साकरे, शरद सोनवणे, आबा वाणी, पप्पू भदाणे, आबा पगारे, अविनाश पाटील, नारायण बोढरे, महेश जयस्वाल, दिलीप बिरारी, विजय कुंभार, जाकीर तांबोळी, गुड्डू शेख, साजिद तांबोळी, बाबुराव पाटील, वसंत मोरे, जयवंतराव देशमुख, जगन नाना, नामदेव बोरसे, नाना बोढरे, अमित सुर्यवंशी, शेख रुबाब, मधुकर अहिरे, शुभम पाटील, प्रशांत पाटील, दीपक आखाडे, अंकुश मोरे, निर्मण आखाडे, लक्ष्मीकांत बोढरे, सतिष बोढरे आदी उपस्थित होते.



## पोलीस पाटलांचे काम नि:पक्षपाती असावे -डीवायएसपी सोनवणे

■ शिंदखेडा । प्रतिनिधी

गावागावातील पोलीस पाटील नियुक्ती हे महत्वाचे पद असून त्यांचे काम निःपक्षपाती असावे, असे प्रतिपादन डीवायएसपी भागवत सोनवणे यांनी केले.

शिंदखेडा पोलीस ठाणे अंतर्गत शिंदखेडा तालुक्यातील पोलीस पाटील यांची बैठक नुकतीच झाली. अध्यक्षस्थानी शिरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी सोनवणे हे होते. त्यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की, पोलीस पाटील म्हणजे गाव पातळीवर पोलीस व महसूल प्रशासनाची महत्वाची भूमिका बजावणारा घटक आहे. त्यामुळे पोलीस पाटील हा निःपक्षपाती पणे काम करणारा असावा. आगामी काळात येणारे सण, उत्सव व निवडणुक काळात पारदर्शक कामगिरी करावी. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रयत्न करावे. पोलीस विभाग व महसूल विभाग नेहमी सहकार्याच्या भुमिकेत असतात. याप्रसंगी शिंदखेडा पोलीस ठाण्याचे पीआय बाळासाहेब थोरात, गोपनीय विभागाचे प्रमुख कुणाल फुलपगारे, पीएसआय ठाकरे, पोलीस पाटील युवराज माळी, शिवाजी पाटील, महेंद्र पाटील, नगराळे आदी उपस्थित होते.

### तरुणास बेदम मारहाण

■ धुळे । प्रतिनिधी

मागील भांडणातून तरूणासह बेदम मारहाण करीत जखमी केल्याप्रकरणी चौघांवर चाळीसगाव रोड पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत वसीम शेख अजिज शेख (वय २८ रा. अलहेरा हायस्कूलमागे, दोन हजार वस्ती, धुळे) याने दिलेल्या तक्रारीनुसार, दि. ४ रोजी रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास खन्ना शहा, भोलू खन्ना शहा, शोएब खन्ना शहा (सर्व रा. दोन हजार वस्ती) व मुस्ताक मुख्तार शहा (रा. पुर्व हुडको, धुळे) यांनी मागील भांडणावरून शिवीगाळ करीत हाताबुक्यांनी व लोखंडी रॉड, बेस बॉलच्या दांडक्याने मारहाण केली. तसेच चाकुने वार करीत जखमी केले. पुढील तपास पोहेकॉं पवार करीत आहेत.

■ धुळे- उसनवार घेतलेले पैसे परत करण्याच्या कारणावरून नागराज वेडू निकुंभ (५९ रा.निमगुळ ता.शिंदखेडा) यांच्यासह त्यांची पत्नी व मुलास तिघांनी घरात घुसून मारहाण केली. दि.६ रोजी हा प्रकार घडला. याप्रकरणी दोंडाईचा पोलिसात गुन्हा नोंद झाला आहे.


## शिरपूर वरवाडे नगरपरिषद

ता.शिरपूर, जि.धुळे, पिन ४२४४०५

जा.क्र./पा.पु.विभाग/१४६६ दि.०७/०८/२०२४

### फेर ई-निविदा सूचना सन २०२४-२५

मुख्याधिकारी, शिरपूर वरवाडे नगरपरिषद, शिरपूर, जि.धुळे यांचेकडून सन २०२४-२५ ते सन २०२६-२७ या ३ वर्षासाठी खालील कामाकरिता ई-निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचा तपशील | बयाणा रक्कम (रु) | निविदा फॉर्म फी रक्कम (रु) | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १. | शिरपूर वरवाडे नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडील कॅमस्ट्रप कंपनीच्या ए.एम.आर.पाणी मीटरचे (मॉडेल नं. FLOW IQ २१०१) दैनंदिन देखभाल, दुरुस्ती, मीटर रीडिंग, बिल जनरेशन इ. कामे करणे. | ६५०००/- | १०००/- | कार्यादेश दिल्यापासून ३ वर्ष |

या कामासाठीचा सविस्तर तपशील https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०९/०८/२०२४ पासून ८ दिवसासाठी उपलब्ध करण्यात येत आहे.

(प्रशांत सरोदे) मुख्याधिकारी,
(शरद मंडलिक) प्रशासक,
शिरपूर वरवाडे नगरपरिषद, शिरपूर, जि.धुळे